महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
☎ ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल ✉: cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा
MHADA

=====================================================================

जावक क्रमांक – ५६/३२५७६७३ दिनांक :- ०५ जून, २०२६

**प्रसिद्धिपत्रक**

# म्हाडाचा १८ वा लोकशाही दिन आता ०९ जून रोजी

## म्हाडा उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांच्या तक्रारींवर चर्चा व तात्काळ निर्णय

मुंबई, दि. ०५ जून, २०२६ : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) सोमवार दिनांक ०८ जून, २०२६ रोजी आयोजित अठरावा लोकशाही दिन काही अपरिहार्य कारणास्तव एक दिवस पुढे ढकलण्यात आला आहे. म्हाडाचा अठरावा लोकशाही दिन आता मंगळवार, दि. ०९ जून, २०२६ रोजी दुपारी १२ वाजेपासून 'म्हाडा'च्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात चौथ्या मजल्यावरील सभागृहात उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला आहे.

म्हाडा प्रशासनाद्वारे नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, जानेवारी-२०२४ पासून प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी म्हाडाच्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयातील सभागृहात म्हाडा लोकशाही दिन आयोजित करण्यात येत आहे. या उपक्रमामध्ये अधिकाधिक नागरिकांनी सहभाग घेऊन आपल्या तक्रारींचे तात्काळ निराकरण करून घ्यावे. आजतागायत म्हाडामध्ये १७ लोकशाही दिन कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे.

लोकशाही दिनांतर्गत नागरिकांच्या प्राप्त तक्रारी अर्जांवर संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत थेट व खुली चर्चा केली जाते. यामुळे वर्षानुवर्ष प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यात आली असून नागरिकांना सुलभ, पारदर्शक आणि त्वरित न्याय मिळत आहे. या उपक्रमामुळे म्हाडा प्रशासन अधिक पारदर्शक, उत्तरदायी व नागरिकांप्रती संवेदनशील बनले असल्याचा विश्वास नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे. प्रत्येक लोकशाही दिन कार्यक्रमापूर्वी श्री. जयस्वाल यांच्याकडून यापूर्वी झालेल्या लोकशाही दिनातील प्रकरणांवर अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या कार्यवाहीचा देखील आढावा घेण्यात येतो. यामुळेच तसेच लोकशाही दिन हा नागरिक आणि प्रशासन यांच्यातील विश्वासाचा मजबूत दुवा ठरत आहे.

म्हाडा प्रशासनाद्वारे कळविण्यात येत आहे की, लोकशाही दिनात सहभागी होण्यासाठी तक्रार अर्ज विहित नमुन्यात असावा. म्हाडा लोकशाही दिनाकरिता अर्जदाराने अर्ज विहित नमुन्यात १५ दिवस अगोदर २ प्रतींत पाठविणे आवश्यक राहील. सदर नमूना अर्ज म्हाडाच्या https://mhada.gov.in संकेतस्थळावर नागरिकांसाठी या अंतर्गत लोकशाही दिन या सदरात उपलब्ध आहे. अर्जदाराची तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाची असावी. न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/अपील्स, सेवाविषयक, आस्थापना विषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे / देण्यात येणार आहे अशा प्रकरणाची पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज, तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे नसतील असे अर्ज म्हाडा लोकशाही दिनात स्वीकारले जाणार नाहीत. जे अर्ज लोकशाही दिनाकरिता स्वीकृत करता येऊ शकणार नाहीत असे अर्ज संबंधित विभागाकडे आवश्यक कारवाईसाठी आठ दिवसात पाठवण्यात येतील व त्याची प्रत अर्जदारास देखील पाठविण्यात येईल.

###

स्वाक्षरीत/-
**मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा** (करिता)

---

**सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. ☎022-55405066/77. Email :cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा MHADA

==================================================

Outward No. : 56/3257673 Dt. 05 June, 2026

## Press Release

**MHADA's 18th Lokshahi Din Rescheduled to June 9**

Discussion and Immediate Redressal of Citizens' Grievances under the Chairmanship of MHADA Vice President & CEO Mr. Sanjeev Jaiswal

Mumbai, June 5, 2026: The 18th edition of Lokshahi Din , scheduled to be held by the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) on Monday, June 8, 2026, has been postponed by one day due to unavoidable circumstances. The programme will now be held on Tuesday, June 9, 2026, from 12:00 noon at the Conference Hall on the fourth floor of MHADA Headquarters, Bandra (East), under the chairmanship of MHADA Vice President and Chief Executive Officer, Mr. Sanjeev Jaiswal (I.A.S).

MHADA has appealed to citizens to actively participate in the initiative and avail themselves of the opportunity for prompt resolution of their grievances. Since January 2024, MHADA has been organising Lokshahi Din on the second Monday of every month at its headquarters in Bandra (East). To date, 17 successful Lokshahi Din programmes have been conducted under the leadership of Mr. Jaiswal.

Under this citizen-centric initiative, complaints and representations submitted by applicants are discussed directly and transparently in the presence of concerned officers. The platform has facilitated the resolution of several long-pending cases, enabling citizens to receive timely, transparent and effective redressal of their grievances. The initiative has strengthened public confidence in MHADA's commitment to transparency, accountability and responsive governance.

Prior to every Lokshahi Din programme, Mr. Jaiswal personally reviews the progress made on complaints and cases discussed during previous sessions. This systematic follow-up mechanism has ensured effective implementation of decisions and has transformed Lokshahi Din into a strong bridge of trust between citizens and the administration.

MHADA has informed citizens that applications for Lokshahi Din must be submitted in the prescribed format at least 15 days in advance and in duplicate. The application form is available on MHADA's official website under the "Citizens" section in the "Lokshahi Din" category.

The complaint or representation should be of a personal nature. Matters that are sub judice, revenue or appeal-related cases, service and establishment matters, applications not submitted in the prescribed format, applications lacking supporting documents, cases where a final reply has already been issued or is under process, repeated representations on the same subject, and complaints that are not personal in nature will not be accepted for Lokshahi Din.

Applications that are not eligible for consideration under Lokshahi Din will be forwarded to the concerned department within eight days for necessary action, and a copy of the communication will also be sent to the applicant.###

Sd/-
Chief Public Relations Officer / MHADA (For)

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial